# <u>नियमीत दिवाणी दावा क्र.४२/२०२० मधील निशाणी क्र.२८ कडील अर्जावर आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र. ३ विलास गेडे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादी क्र. ३ विलास गेडे यांचा मृत्यू दिनांक २५/०८/२०२० रोजी झाला आहे. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांना प्रस्तुत अर्जाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पाच वारस आहेत.

२. प्रस्तुत अर्जाची मयत प्रतिवादी क्र. ३ च्या प्रस्तावीत वारसांना नोटीस काढली असता मयत प्रतिवादी क्र. ३ चे प्रस्तावीत वारस ३अ ते ३इ हे त्यांच्या वकीलांमार्फत या कामी हजर झाले आहेत व त्यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दिले आहे.

३. प्रस्तुत अर्जाच्या कामी वादी व मयत प्रतिवादी क्र. ३ च्या प्रस्तावीत वारसांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. वादीने निशाणी क्र. २७ कडे मयत प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळण्याकरीता स्वतंत्र अर्ज दाखल केला आहे व तो अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे.

५. वादीने नि.क्र.२६ कडील यादीसोबत प्रतिवादी क्र. ३ विलास गेडे यांचे मृत्यू प्रमाणपत्र व पोलीस पाटील, जवळा यांनी दिलेला वारसाचा चौकशी अहवाल दाखल केला आहे. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता व

अर्जातील नमूद कारणे विचारात घेता माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती वादपत्राच्या टायटल क्लॉजमध्ये करावी व त्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

स्वाक्षरी/–

(पां. लिं. घुले)

दिनांक– १३/१२/२०२१ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, दारव्हा.